# NAGPUR CITY POLICE COMMISSIONERATE

नागपूर शहर पोलीस आयुक्तालय

**(पोलीस वार्तापत्र)**

दुपार

**दिनांक ०३.०२.२०२६ मंगळवार**

**(कामगिरी)**

**१) नागपूर शहर पोलीसांची दारूबंदी, मोटर वाहन कायद्या अंतर्गत करण्यात आलेली कारवाई :—**

दिनांक ०२.०२.२०२६ रोजी नागपूर शहर पोलीसांनी, सर्व पोलीस ठाणे हद्दीत, दारूबंदी कायद्यान्वये ०१ केसेस तसेच, एन.डी.पी.एस. कायद्यान्वये ०१ केस असे एकुण ०२ केसेसमध्ये ०२ ईसमांवर कारवाई करून एकुण १,७२५/—रू. चा मुद्देमाल जप्त केला. तसेच, जुगार कायद्यान्वये ०३ केसेस ०३ ईसमांवर एकुण ७३,२९२/—रू. चा मुद्देमाल जप्त केला.

वाहतुक शाखा पोलीसांनी मोटार वाहन कायद्यान्वये ड्रंकन ड्राईव्ह व विविध कलमांखाली १,९६४ वाहन चालकांवर कारवाई करून, एकूण रू. १,६६,९५०/— रू. ची तडजोड शुल्क वसूल केले आहे.

वरील सर्व मोहीम एकत्रितरित्या नागपूर शहर पोलीसांतर्फे राबविण्यात आल्या असून, यापुढेही प्रभावीपणे कारवाई करण्यात येणार आहे. वाहन चालकांनी वाहन चालवितांना वाहतुकीचे नियम पाळुन वाहनासंबंधी सर्व कागदपत्रे जवळ बाळगावित, असे नागरीकांना आवाहन करण्यात येत आहे.

**२) पोलीस ठाणे खापरखेडा :— रेती चोरी करणारा आरोपी ताब्यात.**

दिनांक ०१.०२.२०२६ चे २१.५० वा. ते २२.३० वा. चे दरम्यान, पोलीस ठाणे खापरखेडा येथील तपास पथकातील अधिकारी व अंमलदार हे पोलीस ठाणे हद्दीत पेट्रोलींग करीत असता, त्यांना खात्रीशीर मिळालेल्या माहिती मिळाली की, मौजा नांदा ते लोणखैरी, सिमेंट रोडने पांढऱ्या रंगाची कॅबीन तसेच, निळ्या रंगाचा डाला असलेल्या टिप्परमधून रेतीची चोरी करून अवैधरित्या वाहतूक केली जात आहे. अशा खात्रीशीर माहितीवरून तेथे जावून, मौजा नांदा वार्ड क्र. ०५ येथे सापळा रचून, एका टिप्पर क्र. एम.एच. ४० बी.जी. ५०३६ ला थांबविले. पंचासमक्ष टिप्पर चालक व मालकास त्याचे नाव पत्ता विचारले असता, त्याने त्याचे नाव स्वप्नील रामदास तऱ्हेकर, वय ३७ वर्षे, रा. वार्ड क्र. ०४, खापरखेडा, तह. सावनेर, जि. नागपूर असे सांगितले. टिप्परची पाहणी केली असता, त्यामध्ये एकुण चार ब्रास रेती किंमती २४,०००/— रू. ची मिळून आली. रेतीबाबत कागदपत्राची मागणी केली असता, कोणतेही परवाण्याचे कागदपत्र नसल्याचे आरोपीने सांगितले. आरोपी हा स्वत:चे आर्थिक फायद्याकरीता अवैद्यरित्या विनापरवाना रेती गौण खनिजाची चोरी करून वाहतुक करीत असल्याचे निष्पन्न झाले. आरोपीचे ताब्यातून रेती व टिप्पर ट्रक क्र. एम.एच. ४० बी.जी. ५०३६ असा एकुण किंमती १५,२४,०००/— रू. चा मुद्देमाल जप्त करण्यात आला. याप्रकरणी पोलीस ठाणे खापरखेडा येथे आरोपीविरूध्द कलम ३०३(२) भा.न्या.सं., सहकलम ४८(७), ४८(८) महाराष्ट्र जं. मह. कायदा अन्वये गुन्हा दाखल करून, आरोपीस ताब्यात घेण्यात आले आहे. पुढील तपास सुरू आहे.

वरील कामगिरी मा. श्री. डॉ. संदिप पखाले पोलीस उप आयुक्त (परि. क्र. ६), मा. श्री. अंकुश खेडकर, सहा. पोलीस आयुक्त (कामठी विभाग) यांचे मार्गदर्शनाखाली, वपोनि. हरिष रूमकर, पोउपनि. विलास

करंगामी, पोहवा. नामदेव टेकाम, मुकेश वाघाडे, मपोहवा. कविता गोंडाणे, पोअं. प्रितम ठाकुर, राजू भोयर, अमित खोब्रागडे व दिपक इंगळे यांनी केली.

**(गुन्हे)**

**<u>पोलीस ठाणे जरीपटका :— घरफोडी करणाऱ्या आरोपीविरूध्द गुन्हा दाखल.</u>**

दिनांक ०२.०२.२०२६ चे १०.३० वा. ते १८.०० वा. चे दरम्यान, पोलीस ठाणे जरीपटका हद्दीत, प्लॉट नं. ७४, आर्य नगर, राहुल बोधी बुध्द विहार मागे, जरीपटका, नागपुर येथे राहणारे फिर्यादी जतीन अरविंद श्रीरामे, वय २३ वर्षे यांची आई कामावर बाहेर व फिर्यादी हे आपले राहते घराला कुलुप लावुन रायसोनी कॉलेज येथे गेले असता, कोणीतरी अज्ञात चोरट्याने फिर्यादीचे घराचे खिडकीची काच फोडून, आत प्रवेश करून, बेडरूममधील आलमारीतील रोख १,००,०००/—रू. तसेच, सोन्याचे वेगवेगळे दागिने असा एकुण किंमती २,१४,०००/—रू. चा मुद्देमाल चोरून नेला.

याप्रकरणी फिर्यादी यांनी दिलेल्या तक्रारीवरून पोलीस ठाणे जरीपटका येथे पोउपनि सुनिल गोरडे ९४५८३५२५८५ यांनी अज्ञात आरोपीविरूध्द कलम ३०५, ३३१(३) भा.न्या.सं. अन्वये गुन्हा दाखल केला आहे. आरोपीचा शोध व पुढील तपास सुरू आहे.

**(मिसिंग)**

**<u>पोलीस ठाणे यशोधरानगर</u> :—** सौ. शुभांगी आकाश वासनिक, वय २८ वर्षे, रा. धम्मदिप नगर, यशोधरानगर, नागपूर ह्या दिनांक ०२.०२.२०२६ चे १५.०० वा. पोलीस ठाणे यशोधरानगर हद्दीतील राहते घरी कोणाला काहीही न सांगता कुठेतरी निघुन गेल्या. घरी परत आल्या नाही. त्यांचा शोध घेतला असता मिळून आल्या नाही. **<u>वर्णन</u>** रंग— सावळा, चेहरा— गोल, बांधा— मजबूत, उंची— ५ फुट, केस— काळे लांब, अंगात— हिरव्या रंगाचा टि—शर्ट व काळ्या रंगाचा बरमुडा घातलेला आहे. ओळख— उजव्या हातावर मस्सा आहे.



शुभांगी

**(अकस्मात मृत्यु)**

**<u>पोलीस ठाणे मानकापुर</u> :—** दिनांक ०२.०२.२०२६ चे १३.३० वा. ते १३.४५ वा. चे सुमारास, पोलीस ठाणे मानकापुर हद्दीत, नागपूर—दिल्ली रेल्वे लाईन पोल क्र. १०३८/१७ ते १०३८/१९ दरम्यान, साई मंदीर जवळ मानकापूर, नागपूर येथे एक अनोळखी ईसम वय अंदाजे ५० वर्षे यांना रेल्वेची धडक लागुन, ते मृत अवस्थेत मिळुन आले. मृतकाचे शव पुढील कार्यवाहीस्तव मेयो हॉस्पीटल येथे पाठविण्यात आले आहे. मृतक ईसमाची अद्याप ओळख पटलेली नाही.

याप्रकरणी फिर्यादी राजेश शिरी करदाते, वय ४३ वर्षे, रा. कोलते पेट्रोल पंप मागे, प्लॉट नं. १७, मानकापूर, नागपुर यांनी दिलेल्या सुचनेवरून पोलीस ठाणे मानकापुर येथे पोउपनि. भारत कांबळे ९११२१२६४९३ यांनी अकस्मात मृत्यूची नोंद केली आहे. पुढील तपास सुरू आहे.

**(ईतर)**

**<u>आरोपींनी न्यायालयात हजर होणेबाबत :—</u>**

मा. विद्यमान न्यायाधीश यांनी त्यांचे कोर्टातील केस क्र. व कलम मधील खालील नमुद आरोपी/साक्षीदार हे तारखेवर सतत गैरहजर राहत असल्याने त्यांचेविरुध्द जाहीरनामा प्रसिध्द केला आहे. खालील तक्त्यात नमुद आरोपी / साक्षीदार यांनी नमुद तारखेपर्यंत मा. न्यायालयासमोर हजर व्हावे.

| अ | कोर्टाचे नाव | केस क्र. | कलम | आरोपीचे नाव व पत्ता | पेशी तारीख |
|---|---|---|---|---|---|
| १. | मा. १६ वे सह दिवाणी न्यायाधिश क.स्तर तथा प्रथम श्रेणी न्याय दंडाधिकारी साहेब, नागपुर. | ३०२३४२/ २००६ | कलम ४९८(अ), ५०६, ३४ भा.दं.वि. | १) संतकुमार वामनराव सोनी, वय ४५ वर्षे, २) बेबी उर्फ सपना सोनी, वय ५१ वर्षे दोन्ही रा. प्लॉट नं. ०१, साई सदन, अजनी चौक जवळ, धंतोली, नागपूर. | ०५.०२.२०२६ |
| २. | मा. १३ वे प्रथम श्रेणी न्याय दंडाधिकारी साहेब, नागपुर. | १२४/ २००३ | कलम २९४ भा.दं..वी | १) नरेश सावलदास मोर्यानी, रा. जयताळा, रेल्वे लाईन जवळ, नागपूर. २) सुमित सुनिलचंद्र बसक, रा. सुरेंद्र नगर, प्लॉट नं. १७८, नागपूर. ३) पुरूषोत्तम रामचंद्र मालेवार, रा. सुरेंद्र नगर, प्लॉट नं. २०, नागपूर. | ०६.०२.२०२६ |
| ३. | मा. १३ वे प्रथम श्रेणी न्याय दंडाधिकारी साहेब, नागपुर. | ९१४/ २००३ | कलम २९४ भा.दं..वी | १) अजयसिंग बनारसीलाल ठाकूर, रा. गोकुल पेठ, वाल्मीक नगर, नागपूर. २) उमेश वासूदेव वर्मा, रा. हाउसिंग सोसायटी, धरमपेठ, धंतोली, नागपूर. | ०६.०२.२०२६ |

**स्वा/—**
**( अंकुश राठोड )**
**पोलीस उप—निरीक्षक,**
**पोलीस जनसंपर्क अधिकारी,**
**नागपुर शहर.**